दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा | कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ४५ ✻ जालना ✻ ✻ मंगळवार १५ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

# परतूर शहरात वाजत-गाजत गणरायाचे आगमन

परतूर / प्रतिनिधी : परतूर शहरात आज लाडक्या गणरायाचे मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि वाजत–गाजत आगमन झाले. सकाळपासूनच शहरातील विविध भागांत गणेशभक्तांची लगबग सुरू होती. ढोल–ताशांचा गजर, आकर्षक गणेशमूर्ती, भक्तांची गर्दी आणि 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने शहरातील रस्ते दुमदुमून गेले. विशेष म्हणजे गणरायाच्या आगमनाच्या आनंदात वरुणराजानेही हजेरी लावत पावसाच्या सरींच्या रूपाने जणू बाप्पाचे स्वागत केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी परतूर शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सकाळपासून विविध गणेश मंडळांचे कार्यकर्ते तसेच घरगुती गणपतीची प्रतिष्ठापना करणारे भाविक गणेशमूर्ती घेण्यासाठी बाहेर पडले होते. शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठेत गणेशभक्तांची मोठी वर्दळ होती. मोठ्या गणेशमूर्ती ठरल्या आकर्षण यंदा शहरात विविध सार्वजनिक गणेश मंडळांकडून मोठ्या आणि आकर्षक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. सजविलेल्या वाहनांमधून गणरायाला मंडळांच्या ठिकाणी नेण्यात आले. ढोल–ताशांच्या तालावर तरुणाईने ठेका धरत बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले. विविध रूपातील आकर्षक गणेशमूर्ती नागरिकांचे लक्ष वेधून घेत होत्या. गणरायाच्या मिरवणुकीत बाळगोपाळांसह युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. चिमुकल्यांचा उत्साह विशेष लक्षवेधी होता. 'गणपती बाप्पा मोरया', 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. पावसाच्या सरी अन् भक्तांचा जल्लोष गणरायाच्या आगमनाच्या वेळी वरुणराजानेही हजेरी लावल्याने गणेशभक्तांचा आनंद आणखी द्विगुणित झाला. पावसाच्या सरी कोसळत असतानाही भक्तांचा उत्साह



**बाप्पाच्या स्वागताला वरुणराजाचीही हजेरी; पावसाच्या सरींनी उत्साह द्विगुणित ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष; बाळगोपाळांसह तरुण, महिला व ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**


तसूभरही कमी झाला नाही. उलट पावसातही ढोल–ताशांच्या तालावर गणेशभक्त बाप्पाच्या स्वागतासाठी आनंदाने सहभागी झाल्याचे चित्र अनेक भागांत पाहायला मिळाले. पावसाच्या आगमनामुळे नागरिकांसह शेतकरी बांधवांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले. एकीकडे विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन आणि







दुसरीकडे वरुणराजाची हजेरी, असा दुहेरी आनंद परतूरकरांनी अनुभवला. सायंकाळपर्यंत शहरातील विविध भागांत गणेशमूर्तींचे आगमन सुरू होते. विधिवत पूजा–अर्चा आणि आरती करून सार्वजनिक मंडळांसह घराघरांत गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.



गणरायाच्या आगमनामुळे परतूर शहरात पुढील काही दिवस भक्ती, उत्साह आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. परतूर शहरात ढोल–ताशांच्या गजरात व 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात वाजत–गाजत गणरायाचे स्वागत करताना गणेशभक्त.

# आ.बबनराव लोणीकर यांच्या 'श्री भक्ती' निवासस्थानी गणरायाचे भक्तिभावाने आगमन

**बळीराजावरील संकट दूर होऊन शेतशिवार हिरवाईने फुलू दे; गणरायाच्या चरणी साकडे**

जालना, प्रतिनिधी : यशवंत नगर येथील आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या 'श्री भक्ती' निवासस्थानी आज विघ्नहर्त्या श्री गणरायाचे मोठ्या भक्तिभावाने आणि मंगलमय वातावरणात आगमन झाले. धार्मिक विधी व मंत्रोच्चाराच्या वातावरणात विधिवत पूजा–अर्चा करून श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. गणरायाच्या आगमनामुळे संपूर्ण निवासस्थान भक्तिमय वातावरणाने भारावून गेले होते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापनेनंतर लोणीकर कुटुंबीयांनी आरती



करून गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांवर आलेले संकट दूर व्हावे, राज्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस पडावा, पावसाअभावी अडचणीत सापडलेल्या खरीप पिकांना नवसंजीवनी मिळावी आणि बळीराजा सुखी, समृद्ध व समाधानी व्हावा, अशी मनोभावे प्रार्थना श्री गणरायाच्या चरणी करण्यात आली. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा **(पान ३ वर)**

# रोटरी क्लब जालना मिडटाऊनतर्फे सहा शिक्षकांना नेशन बिल्डर पुरस्कार प्रदान

जालना/ प्रतिनिधी : रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनच्यावतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून सहा शिक्षकांचा 'नेशन बिल्डर अवॉर्ड' देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन क्लबचे अध्यक्ष अलोक नानावटी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी कॉप्स प्रेसिडेंट प्रमोद झांझरी हे उपस्थित होते. व्यासपीठावर सचिव मनमोहन भक्कड यांची उपस्थिती होती. यावेळी श्री. नानावटी म्हणाले की, राष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अनन्यसाधारण असून, भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत शिक्षकांचा 'नेशन बिल्डर' म्हणून सन्मान करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. झांझरी यांनी शिक्षकांच्या समाज व राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे महत्त्व अधोरेखित करून रोटरी क्लबच्या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी गणेश कुंडलिक तांबेकर, श्रीमती एस. पी. राठोड, ओमप्रकाश गाढवे, श्रीमती दीपली उगलमुगले, श्रीमती पौर्णिमा सोमाणी आणि संतोष नागवडे या सहा शिक्षकांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड' प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी शिक्षकांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षक म्हणून कार्य करताना आलेले अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्लबचे सदस्य शैलेश ठक्कर, लिटरेसी डायरेक्टर भूषण देविदान यांनी विशेष **(पान ३ वर)**

# गणेश चतुर्थीनिमित्त आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना

जालना : श्री गणेश चतुर्थीच्या पवित्र दिनानिमित्त आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या 'दर्शना बंगल्यावर' निवासस्थानी श्री गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना व पूजा परिवाराच्या हस्ते भक्तिभावाने संपन्न झाली. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी श्री गणरायाच्या चरणी राज्यातील जनतेच्या सुख, समाधान आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. राज्यातील सध्याची पावसाची परिस्थिती पाहता अनेक भागांत बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा,



राज्यात समाधानकारक पाऊस पडावा आणि शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सुख, समृद्धी व आनंद नांदावा, अशी मनोकामना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गणरायाच्या चरणी व्यक्त केली. यावेळी गणरायाची आरती, पूजन व धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात पार पडले. परिवारातील सदस्यांसह उपस्थितांनी श्री गणरायाचे दर्शन घेत राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. ✻गणपती बाप्पा मोरया! राज्यातील जनतेच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि आनंद नांदो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# कारची काच फोडून चोरलेले सहा लाख रुपये जप्त ; बदनापूर पोलिसांची आंध्र प्रदेशात कारवाई; आरोपींचा शोध सुरू

बदनापूर : बदनापूर शहरातील ड्झख बँकेतून १० लाख रुपये काढून कारमधून जात असलेल्या व्यक्तीच्या वाहनाचा पाठलाग करून कारची काच फोडत सहा लाख रुपयांची चोरी करणाऱ्या आरोपींचा बदनापूर पोलिसांनी छडा लावला आहे. पोलिसांनी आंध्र प्रदेशात जाऊन आरोपीच्या राहत्या घरातून चोरीस गेलेली सहा लाख रुपयांची रक्कम जप्त केली आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी विष्णु कुंडलीकराव कोल्हे (वय ४९, रा. धोपटेश्वर, ता. बदनापूर, जि. जालना) यांनी बदनापूर शहरातील ड्झख बँकेतून १० लाख रुपये काढले होते. ही रक्कम घेऊन ते आपल्या कारमधून धोपटेश्वरकडे जात होते. चोरट्यांनी त्यांच्यावर पाळत ठेवून मोटारसायकलवरून कारचा पाठलाग केला. धोपटेश्वर ते देवगाव रोडवरील शेत परिसरात कोल्हे यांनी कार उभी करून शेतात गेल्यानंतर चोरट्यांनी कारच्या मागील दरवाजाची काच फोडून त्यातील रक्कम लंपास केली. परत आल्यानंतर कारची काच फुटलेली आणि त्यातील पैसे गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी त्यांनी बदनापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. CCTV व तांत्रिक तपासातून आरोपींचा शोध पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेत दोन तपास पथके तयार केली. उउढ्त फुटेज तसेच तांत्रिक **(पान ३ वर)**

# माळीपुरा जामा मस्जिद चौकात डासांचा कहर

जालना : जुना जालना भागातील माळीपुरा जामा मस्जिद चौक, प्रभाग क्रमांक १० परिसरात गेल्या काही दिवसांपासून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. नाल्यांमध्ये साचलेले पाणी, अस्वच्छता आणि नियमित स्वच्छतेचा अभाव यामुळे डासांची उत्पत्ती वाढत असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सकाळ–संध्याकाळ डासांचे प्रमाण वाढत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ



नागरिक तसेच महिला व इतर रहिवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. डासांमुळे आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता असताना महानगरपालिका प्रशासन नेमके कोणत्या मोठ्या संकटाची वाट पाहत आहे, असा संतप्त सवाल शेख अनीस मित्र मंडळाकडून उपस्थित केला जात आहे. फॉगिंगसह नाल्यांमध्ये पावडर फवारणीची मागणी डासांचा प्रादुर्भाव तातडीने रोखण्यासाठी माळीपुरा जामा मस्जिद चौक परिसरात संपूर्ण फॉगिंग करण्यात यावे. तसेच नाल्यांमध्ये प्रभावी**(पान ३ वर)**

# ब्राह्मण सभा भवनात श्री गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना

जालना : जालना ब्राह्मण सभेच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त ब्राह्मण सभा भवनमध्ये सोमवारी सायंकाळी परंपरागत उत्साहात श्रीं च्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. यावेळी सुरेश मगरे यांच्याहस्ते विधिवत पूजन करण्यात आले. या मूर्ती स्थापनेवेळी श्रीकांत शेलगावकर, डॉ. संजय रईखेडकर, सुनंदा बदनापूरकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी ब्राह्मण सभेचे अध्यक्ष रमेश देहेडकर ब्राह्मण सभेचे सचिव आर. आर. जोशी




, ॲड. सी. डी. देशपांडे , दिलीप देशपांडे, रमेश मगरे, ॲड.बलवंत नाईक, डिगंबर काजळकर, सुनील जोशी, अनिल कुलकर्णी, मिलिंद जहागीरदार, वल्लभ जवळेकर, नायगावकर, रसना देहेडकर, संतोष दानी, कल्याण कुलकर्णी, महेश वझरकर, प्रा.पवन देशमुख, रविंद्र देहेडकर, डॉ. पोर्णिमा रूईखेडकर, शुभांगी देशपांडे, प्रमोद जोशी, सुखदा देशपांडे, उज्वला मगरे, संध्या मगरे, छाया देहेडकर यांच्यासह ब्राह्मण सभेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# नंदापूरला मिळणार नवी ओळख; भारत माता मंदिराचे २८ सप्टेंबरला लोकार्पण

**ह. भ. प. डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून केली जाणार मंदिराची उभारणी**

जालना / दशरथ वाकोडे : द्राक्ष उत्पादनासाठी एकेकाळी जिल्ह्यात अग्रगण्य असलेल्या नंदापूर गावाच्या वैभवात आता आणखी एका महत्त्वपूर्ण वास्तूची भर पडली आहे. गुरुवर्य ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या भव्य भारत माता मंदिराचा लोकार्पण सोहळा सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ३.४५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या भव्य–दिव्य भारत माता मंदिरामुळे नंदापूर गावाची एक वेगळी ओळख निर्माण




होत असून, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीचा संदेश देणारे हे मंदिर परिसराचे आकर्षण ठरणार आहे. मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैयुजी जोशी तसेच जालना येथील उद्योजक घनशामजी गोयल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नंदापूर हे गाव द्राक्ष उत्पादनासाठी विशेष ओळखले जाते. येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर द्राक्षाचे उत्पादन घेत असून, कृषी क्षेत्रात गावाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यातच आता भारत माता मंदिराची भव्य वास्तू उभी राहत असल्याने नंदापूरच्या ओळखीत आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. विशेष म्हणजे भारत माता मंदिर हे समृद्धी महामार्गापासून अवघ्या दोन मिनिटांच्या **(पान ३ वर)**

# संपादकीय

## गणपती बाप्पा मोरया !

भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा-अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा, बेल-फुल,शम्मीपत्र,शेंदूर यांचा मुख्यत्वे करून वापर होतो. भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी नामांकित मंदिरे आहेत. त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला द्‌वी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा-महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे. संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल. काल लाडक्या गणरायाचे मोठ्या उत्साहात वाजत-गाजत सर्वत्र आगमन झाले आहे. यंदा बहुतांश ठिकाणी दुष्काळाचे सावट असल्याचे जाववत असून त्यांची तुट भरून निघो अणि गणरायांच्या आशीर्वादाने आगमानाने दुष्काळ मुक्त होवो हिच आज रोजी आशीर्वादारूपी गणरायांकडे मागणी

**गणपती बाप्पा मोरया!**

# ओबीसी सारख्या सवलती मराठा समाजास देतांना केजी ते पीजी सवलती द्या : जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची मागणी

प्रतिनिधी (मुंबई )मराठा आरक्षणा संदर्भातील न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल पाहिला तर त्याच्या मुख्य शिफारशींचा गाभा पाहता ओबीसी सारख्या सवलती मराठा समाजास देतांना केजी ते पीजी सवलती द्या, वैद्यकीय- अभियांत्रिकी-व्यवसाईक ऊन समाज मनातील आक्रोश दुर करा व सुधारीत शासनादेश काढा अशी महत्वाची समाज मन जोडणारी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी शासना कडे करून शुक्रे आयोगाचे सविस्तर वाचन केल्याचे सिद्ध केले आहे.

आयोगाच्या मुख्य शिफारशी आम्ही अभ्यासल्या या बाबत बोलतांना ते म्हणाले की,मराठासमाजाला स्वतंत्र सामाजिक-शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग म्हणून मान्यता द्यावी.मराठा समाजा साठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करावी,इतर मागासवर्गीयांच्या विद्यमान आरक्षणाला धक्का न लावता. शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये स्वतंत्र आरक्षण द्यावे.असामान्य व अपवादात्मक परिस्थिती असल्याचे नमूद करून ५० % आरक्षणाची घटनात्मक मर्यादा ओलांडण्याचे समर्थन करावे.मराठा समाजातील शैक्षणिक मागासलेपणा, सरकारी सेवांमधीलअपुरे प्रतिनिधित्व आर्थिक अडचणी आणि सामाजिक मागासलेपणा यांचा विचार करावा. आरक्षणासाठी जात निहाय व सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणातील आकडेवारीचा आधार घ्यावा अशी महत्वाची नोंद हा अहवाल महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या आयोगाचा असून, आयोगाने राज्यातील सुमारे १ कोटी५८ लाख कुटुंबांचा सर्वे क्षणात्मक अभ्यास केला होता.मात्र, अहवालातील संपूर्ण शिफारशींचे अधिकृत व प्रमाणित स्वरूप सरकारने प्रसिद्ध केलेल्या अहवाल/ शासन निर्णयातूनच तपासणे योग्य ठरणार असल्याचे महत्वाचे मत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मांडताना नमुद केले की, कायद्याच्या दृष्टीने,५० टक्के मर्यादा ओलांडण्याचे समर्थन करण्यासाठी विशेष परिस्थिती आणि परिमाणात्मक,अद्ययावत

-विश्वासार्ह आकडेवारी आवश्यक ठरते; त्यामुळे आयोगाच्या शिफारशींची घटनात्मक वैधता न्यायालयीन परीक्षणाच्या अधीन राहते.न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षते खालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मराठा समाजावरील सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये तपासली तर लक्षात येईल की,सर्वेक्षणाची व्याप्ती पाहता सर्वे क्षण राज्यभर करण्यात आले.ग्रामीण तसेच शहरी भागातील मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला. सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचे सर्वे क्षण झाल्याचे सांगण्यात आले; त्यातून सुमारे अडीच कोटी व्यक्तींची माहिती संकलित झाल्याचे राज्य सरकारने नमूद केले. हे सर्वेक्षण २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत पूर्ण करण्यात आले. सर्वेक्षणाची विषयवस्तू सर्वे क्षणात मराठा समाजाच्या अनेक बाबींचा अभ्यास करण्यात आला- सामाजिक स्थिती आणि सामाजिक मागासले पणा शैक्षणिक स्थिती व शिक्षणा तील सहभाग. सरकारी नोकरी आणि सार्वजनिक सेवांमधील प्रतिनिधित्व आर्थिक स्थिती,उत्पन्न आणि रोजगार ग्रामीण-शहरी जीवन मानातील फरक

कुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती.आत्महत्या,शेती, कर्जबाजारीपणा व उप जीविकेशी संबंधित परिस्थिती आणि विशेष म्हणजे सांख्यिकीय पद्धती आयोगाने मोठ्या प्रमाणावर कुटुंबाधारित प्रत्यक्ष सर्वेक्षण केले.माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला असुन मराठा समाजाची स्थिती इतर समाजघटकांशी आणि खुल्या प्रवर्गाशी तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला.आयोगाने आपल्या अभ्यासाला राज्यातील मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा तपशीलवार व सखोल अभ्यास असे स्वरूप दिले. विशेष वैशिष्ट्ये असे की,अत्यंत मोठ्या प्रमाणातील सर्वे क्षण -राज्यातील जवळपास सर्व मराठा कुटुंबां पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला असुन ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांचा समावेश-सर्वेक्षण केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नव्हते तर बहुआयामी अभ्यास-फक्त आर्थिक निकषांऐवजी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक निकषांचा एकत्रित विचार करण्यात आला.

आरक्षणाच्या घटनात्मक परीक्षणा साठी आकडे वारीचा आधार- सरकारी नोकरी व शिक्षणातील प्रतिनिधित्व, मागासलेपण आणि विशेष परिस्थिती सिद्ध करण्यासाठी परिमाणात्मक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु पुढे बोलतांना जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी चर्चेतील आक्षेप देखील नमुद केला असुन या सर्वेक्षणाच्या कार्यपद्धतीवर काही आक्षेप ही घेण्यात आले. विशेषत सर्वेक्षणाचा कालावधी अत्यंत कमी होता, प्रश्नावली व नमुना-निवडीची पद्धत, आकडेवारीची स्वतंत्र पडताळणी आणि अहवालातील निष्कर्षांची विश्वासार्हता याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.त्यामुळे सर्वे क्षणाची वैशिष्ट्ये सांगताना व्यापकता आणि जलद अंमलबजावणी ही दोन्ही परस्परविरोधी बाजू लक्षात घेणे आवश्यक आहे. आयोगाने व्यापक माहिती संकलित केल्याचा दावा केला, तर टीकाकारांनी अल्पकाला वधीत केलेल्या संकलना मुळे पद्धतशास्त्रीय त्रुटी राहू शकतात अशी चर्चा पुढे आली आहे.परंतु वास्तविकता अशी आहे की,न्या. सुनील शुक्रे आयोगाच्या सर्वेक्षणात खुल्या प्रवर्गाचा स्वतंत्र तुलना-गट म्हणून समावेश करण्यात आला होता. आयोगाने मुख्यतः मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गा तील कुटुंबांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सर्वेक्षण केले इतर मागासवर्गीय- अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींचे स्वतंत्र व्यापक सर्वेक्षण करण्यात आले नाही,अशी नोंद उपलब्ध वृत्तांतांत आहे.खुल्या प्रवर्गाचा समावेश कसा केला ?मराठा कुटुंबांप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील कुटुंबां कडून माहिती घेण्यात आली. शहरी आणि ग्रामीण भागा तील कुटुंबांचा समावेश करण्यात आला. घराघरांत जाऊन प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करण्यात आली. प्रश्नावलीत सुमारे १५० ते १५४ प्रश्न होते या प्रश्नांमध्ये कुटुंबाचे उत्पन्न व आर्थिक स्थिती शिक्षण,रोजगार व सरकारी सेवांतील प्रतिनिधित्व



महिलांची स्थिती आरोग्यसेवा व उपचारांची उपलब्धता पाणी व मूलभूत सुविधा बालमृत्यू,कुपोषण आणि सामाजिक परिस्थिती तुलना-गट म्हणून भूमिका खुल्या प्रवर्गातील कुटुंबांची माहिती मराठा समाजाच्या स्थितीशी तुलना करण्या साठी वापरण्यात आली. म्हणजेच मराठा समाज सामाजिक-शैक्षणिक दृष्ट्यामागास आहे का,हे ठरवताना खुल्या प्रवर्गातील सामाजिक शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक स्थितीशी तुलनात्मक विश्लेषण करण्यात आलेले असुन

महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा येथे खुला प्रवर्ग म्हणजे एकसंध जातसमूह नव्हे. खुल्या प्रवर्गातील जागा सर्व जातींसाठी खुल्या असतात; त्यामुळे त्यात विविध सामाजिक व आर्थिक स्तरांतील व्यक्ती असू शकतात.म्हणून खुल्या प्रवर्गाला एकसंध अ-मागास समूह मानून केलेली तुलना ही आयोगा च्या पद्धतशास्त्रातील महत्त्वाची बाब ठरते आणि तिच्या वैधतेवर काही आक्षेप ही घेण्यात आले असे नमुद करून जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की,न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मराठा समाजा वरील सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्वेक्षणाची व्याप्ती सर्वेक्षण राज्यभर करण्यात आले. ग्रामीण तसेच शहरी भागातील मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला.सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगण्यात आले; त्यातून सुमारे अडीच कोटी व्यक्तींची माहिती संकलित झाल्याचे राज्य सरकारने नमूद केले. हे सर्वेक्षण २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या अल्प कालावधीत पूर्ण करण्यात आले.

सर्वेक्षणाची विषयवस्तू सर्वे क्षणात मराठा समाजाचा विविध अंगाचा अभ्यास करण्यात आला- सामाजिक स्थिती व सामाजिक मागासलेपणा. शैक्षणिक स्थिती व शिक्षणातील सहभाग.सरकारी नोकरी आणि सार्वजनिक सेवां मधील प्रतिनिधित्वआर्थिक स्थिती, उत्पन्न आणि रोजगारग्रामीण-शहरी जीवन मानातील फरक.कुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती आत्महत्या,शेती, कर्ज बाजारी पणा आणि उपजीविकेशी संबंधित परिस्थिती.सांख्यिकीय पद्धतीआयोगाने मोठ्या प्रमाणावर कुटुंबाधारित प्रत्यक्ष सर्वेक्षण केले. माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. मराठा समाजाची स्थिती इतर समाजघटकांशी आणि खुल्या प्रवर्गाशी तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

आयोगाने आपल्या अभ्यासाला राज्यातील मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा तपशीलवार व सखोल अभ्यास असे स्वरुप दिले. विशेष वैशिष्ट्ये अत्यंत मोठ्या प्रमाणातील सर्वेक्षण -राज्यातील जवळपास सर्व मराठा कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांचा समावेश-सर्वेक्षण केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नव्हते तर बहु आयामी अभ्यास-फक्त आर्थिक निकषांऐवजी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक निकषांचा एकत्रित विचार करण्यात आला.आरक्षणाच्या घटनात्मक परीक्षणासाठी आकडेवारीचा आधार- सरकारी नोकरी व शिक्षणातील प्रतिनिधित्व, मागासलेपण आणि विशेष परिस्थिती सिद्ध करण्या साठी परिमाणात्मक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे नमुद करतांना जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या अहवालाचे सखोल निरीक्षण केले नसल्याचा दावा आपोआप खोटा व अयोग्य असल्याचे सिद्ध झाले असुन त्यांचे अन्नत्याग आंदोलन उपोषण म्हणूनच राज्य सरकारची डोकेदुखी ठरली असल्याची बाब संपूर्ण महाराष्ट्रात चर्चीली जात आहे हे विशेष होय.

# देवाचे स्मरण आवश्यक:मंत्री राणे

मुंबई: हिंदू भूमीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांपासून तिचे रक्षण करण्यासाठी वराह देवाचे स्मरण आणि पूजन आवश्यक आहे. हिंदू समाजाने आपल्या सणांच्या माध्यमातून संघटित राहून हिंदू राष्ट्र अधिक भक्कम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी रविवारी केले. घोडपदेव येथील हनुमान मंदिरात वराह जयंतीनिमित्त आयोजित महाआरतीनंतर ते बोलत होते. वराह जयंतीच्या निमित्ताने हिंदू बांधव, हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि संत मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी राणे यांनी वराह देव हा भगवान विष्णूचा चौथा अवतार असल्याचे सांगत हिंदू भूमीच्या रक्षणाशी त्याचे महत्त्व विशद केले. ज्याप्रमाणे वराह देवाने राक्षसापासून पृथ्वीचे रक्षण केले, त्याचप्रमाणे हिंदू भूमीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांपासून तिचे रक्षण करण्यासाठी हिंदूंनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. (छळींशीह ठरपश छशुी) एका दिवसापुरती वराह जयंती साजरी न करता, जेव्हा जेव्हा हिंदू समाजाकडे वाकड्या नजरेने पाहिले जाईल, तेव्हा मोठ्या उत्साहात वराह जयंती साजरी झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. वराह देवामध्ये अशा शक्तींना रोखण्याची ताकद असल्याचेही त्यांनी सांगितले. गणेशोत्सवासह हिंदूंचे सर्व सण नाचत-गाजत आणि उत्साहाने साजरे झाले पाहिजेत, असेही राणे म्हणाले. हिंदू म्हणून एकत्र येणे आणि संघटित राहणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगत त्यांनी हिंदू कार्यकर्त्यांचे कौतुक केले. हिंदू समाजाकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिले, तर त्याला कसे उत्तर द्यायचे हे महाराष्ट्रातील आणि देशातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी दाखवून दिले आहे, असेही ते म्हणाले.

# कल्याणमध्ये ओव्हरहेड वायर बिघाडामुळे प्रवाशांचा खोळंबा

मुंबई : मध्य रेल्वेच्या मार्गावरील लोकल सेवा तांत्रिक बिघाडामुळे विस्कळीत झाली आहे. कल्याण रेल्वे स्थानकाजवळ ओव्हरहेड वायरमध्ये बिघाड झाल्याने लोकल वाहतुकीवर परिणाम झाला असून डोंबिवलीहून कसाऱ्याकडे जाणारी लोकल सेवा खोळंबली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरं जावं लागत आहे. मिळालेल्या माहितीनुसार,



रविवार (ता.१३) रोजी मध्य रेल्वे मार्गावरील कल्याण रेल्वे स्थानकात ओव्हर हेड वायरमध्ये बिघाड झाला. यामुळे कसारा डाऊन लाईनची सेवा विस्कळीत झाली असून डोंबिवलीहून कसाऱ्याकडे जाणाऱ्या लोकल सेवा ठप्प झाल्या आहेत. कल्याण रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म १ आणि २ प्रवाशांची मोठी गर्दी निर्माण झाली आहे. उशपीीरश्र ठरळश्रुर : तिकीट मिळालं नाही म्हणून चिंता नको! कोकणात जाणाऱ्यांसाठी मध्य रेल्वेच्या ४ अनारक्षित विशेष गाड्या सोडण्याची घोषणा मुंबई : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची वाढती गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेने प्रवाशांसाठी आणखी चार अनारक्षित विशेष फेऱ्या जाहीर . कल्याण रेल्वे स्थानकात ओव्हरहेड वायरमध्ये बिघाड झाल्याने रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. कल्याण स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक २ वरील ओव्हरहेड वायरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने कसारा दिशेकडील डाऊन मार्गावरील रेल्वे सेवा विस्कळीत झाली. अचानक झालेल्या या बिघाडामुळे लोकलसह एक्स्प्रेस गाड्यांना काही काळ खोळंबा सहन करावा लागला. दरम्यान, बिघाडाची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले. युद्धपातळीवर ओव्हरहेड वायर दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले होते. सुरक्षेच्या दृष्टीने दुरुस्तीच्या कामादरम्यान प्लॅटफॉर्म क्रमांक ३, ४ आणि ५ वरील विद्युत पुरवठाही बंद करण्यात आला. या तांत्रिक बिघाडामुळे कल्याण स्थानकातील रेल्वे वाहतुकीचे वेळापत्रक विस्कळीत झाले. लोकल तसेच काही एक्स्प्रेस गाड्या सुमारे ४५ मिनिटे रखडल्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. या काळात रेल्वे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काही लोकल गाड्या प्लॅटफॉर्म क्रमांक ६ आणि ७ वरून चालवण्यात आल्या. दरम्यान, ओव्हरहेड वायरमधील तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यासाठी रेल्वेच्या तांत्रिक पथकाकडून वेगाने काम सुरू होते. बिघाड दूर झाल्यानंतर लोकल सेवा पूर्ववत करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली.

# गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मुंबईत पावसाची हजेरी!

मुंबई : गणरायाच्या आगमनाने मुंबईत गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असतानाच शहरात पावसानेही हजेरी लावली आहे. आज, १४ सप्टेंबर रोजी मुंबईत अनेक भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. काही ठिकाणी वाऱ्याचे झोतही जाणवत असून, ढगाळ वातावरण कायम आहे. मात्र, मुंबई शहर आणि उपनगरांसाठी आज कोणताही मोठा हवामान इशारा जारी करण्यात आलेला नाही. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मुंबईत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना होत आहे. त्यामुळे रस्त्यांवर नागरिकांची मोठी गर्दी असून, अनेक ठिकाणी मिरवणुका आणि स्वागत सोहळे आयोजित करण्यात आले आहेत. अशा



परिस्थितीत पावसामुळे मंडळांच्या तयारीवर आणि नागरिकांच्या हालचालींवर काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे. मुंबईत पावसाची शक्यता कायम

हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबईत आज दिवसभर ढगाळ वातावरणासह पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे. काही भागांत पावसाचा जोर वाढू शकतो, तर काही ठिकाणी पावसात विश्रांतीही मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे गणेशभक्तांनी घराबाहेर पडताना हवामानाची स्थिती लक्षात घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सध्या मुंबईसाठी मोठा इशारा नसला, तरी शहराच्या आसपासच्या भागात हवामानाची परिस्थिती तुलनेने अधिक सक्रिय आहे. ठाणे आणि पालघर परिसरासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे या भागांत मुसळधार पावसासोबत मेघगर्जना आणि वाऱ्याचा जोर जाणवण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवात नागरिकांनी काळजी घ्या

गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील रस्त्यांवर मोठी गर्दी होत असल्याने पावसामुळे वाहतुकीचा वेग मंदावण्याची शक्यता आहे. सार्वजनिक मंडळांच्या मिरवणुका, गणेश आगमन सोहळे आणि दर्शनासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः वीजेचा कडकडाट, जोरदार वारे किंवा अचानक पावसाचा जोर वाढल्यास नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. समुद्रकिनारी जाणाऱ्या नागरिकांनीही विशेष खबरदारी घ्यावी. दरम्यान, मुंबईत आज पाऊस सुरू असला तरी गणेशोत्सवाच्या उत्साहावर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. बाप्पाच्या आगमनासोबत मुंबईकरांवर वरुणराजाचीही कृपादृष्टी कायम राहणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पोलिसांचा दणका; १२.६० लाखांचे डीजे साहित्य जप्त

## राजुरा शहरात विनापरवाना कर्कश आवाजात डीजे वाजवणे भोवले; दोघांविरुद्ध गुन्हा

चंद्रपूर / प्रतिनिधी : गणेशोत्सव पारंपरिक आणि सांस्कृतिक पद्धतीने तसेच ध्वनिप्रदूषणविषयक नियमांचे पालन करून साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत असतानाच चंद्रपूर जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पोलिसांनी डीजेविरोधात धडक कारवाई केली. राजुरा शहरात विनापरवाना कर्कश आवाजात डीजे वाजविल्याप्रकरणी पोलिसांनी सुमारे १२ लाख ६० हजार रुपये किमतीचे डीजे साहित्य व संबंधित मुद्देमाल जप्त केला असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध भागांत 'नो डीजे, नो डॉल्बी'चा संदेश देण्यात येत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, ध्वनिप्रदूषण टाळावे आणि उत्सवाचे पावित्र्य जपावे, यासाठी पोलीस व प्रशासनाकडून सातत्याने आवाहन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राजुरा पोलिसांनी केलेली कारवाई लक्षवेधी ठरली आहे. बोलेरो पिकअपमध्ये सुरू होता डीजे राजुरा शहरातील नवीन बसस्थानकासमोर एका बोलेरो पिकअप वाहनामध्ये मोठ्या आणि कर्कश आवाजात डीजे वाजविण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी संबंधितांकडे डीजे वाजविण्यासाठी आवश्यक परवानगीबाबत विचारणा केली. मात्र आवश्यक परवाना उपलब्ध नसल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी कारवाई करत डीजेचे संपूर्ण साहित्य ताब्यात घेतले. या कारवाईत डीजे यंत्रणा व अन्य संबंधित मुद्देमाल असा एकूण १२ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे



सांगण्यात आले.

दोघांविरुद्ध गुन्हा

विनापरवाना डीजे वाजविल्याप्रकरणी रवी एकवणकर आणि सचिन सरोज या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या प्रारंभीच झालेल्या या कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलिसांनी स्पष्ट संदेश दिला आहे. उत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. आगामी आगमन व विसर्जन मिरवणुकांमध्येही नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्याचे आवाहन गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव असल्याने तो पारंपरिक पद्धतीने साजरा करावा, असे प्रशासनाचे आवाहन आहे. ढोल-ताशे आणि इतर पारंपरिक वाद्यांचा वापर करतानाही निर्धारित ध्वनिमर्यादेचे पालन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये गणेशोत्सवापूर्वीच पोलीस प्रशासनाने सार्वजनिक मंडळांच्या बैठका घेऊन डीजे, डॉल्बी आणि अतितीव्र ध्वनिक्षेपकांबाबत सूचना दिल्या आहेत. मिरवणुकीदरम्यान नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती, लहान मुले, रुग्ण तसेच सर्वसामान्यांना त्रास होणार नाही याची काळजी मंडळांनी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

नियम मोडल्यास कारवाई

गणेशोत्सव काळात विनापरवाना डीजे किंवा ध्वनिक्षेपकांचा वापर करून कायद्याचे उल्लंघन केल्यास कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश राजुरा येथील कारवाईतून पोलिसांनी दिला आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळांनी आवश्यक परवानग्या घेऊन आणि ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे काटेकोर पालन करून उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करून निवासस्थानी विधिवत पूजन करतांना माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.शोभाताई अंबेकर व कन्या नेहा छायाचित्रात दिसत आहेत.

### महापौर यांच्या घरी श्रीगणेशा

मुंबई : श्री गणेश चतुर्थीच्या पावन पर्वावर मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या शासकीय निवासस्थानी विघ्नहर्त्या गणरायाची अत्यंत मंगलमय वातावरणात प्रतिष्ठापना करण्यात आली. दीड दिवसांच्या या लाडक्या बाप्पाच्या आगमनाने संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्यावरणपूरकतेला विशेष प्राधान्य महापौर निवासस्थानावरील गणेशोत्सवाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणपूरकतेला दिलेले प्राधान्य आहे.



परतूर येथील नवतरुण गणेश मंडळ श्री गणेशा

# गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा;

## महाराष्ट्राच्या लोककलेचा देश-विदेशात व्यापक जागर

मुंबई : गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानिमित्त महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा राज्याच्या सीमांपलीकडचे देश-विदेशातील रसिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित 'लोककलेतील श्रीगणेश' या उपक्रमांतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांसह देशातील विविध राज्यांत, नवी दिल्लीत आणि दुबईत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

देशातील विविध राज्यांमधील सादरीकरणे

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी देशातील विविध प्रमुख शहरांत खास कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे:

देहरादून (उत्तराखंड): १६ सप्टेंबर रोजी इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी येथे पारंपरिक ढोल-ताशा वादन. जम्मू (जम्मू-काश्मीर): १८ सप्टेंबर रोजी पद्मश्री पद्मा सचदेव शासकीय महाविद्यालय सभागृहात लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य आणि गायन. चेन्नई (तमिळनाडू): २० सप्टेंबर रोजी कृष्णा गणा सभा येथे नमन, गण, जाखडी, मंगळागौर, आदिवासी, धनगरी, कोळी नृत्य आणि जागरण-गोंधळ. सिल्वासा (दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दीव): २१ सप्टेंबर रोजी कला केंद्रात लेझीम, गण-गौळण, बाल्या नृत्य आणि शास्त्रीय नृत्य. लखनऊ (उत्तर प्रदेश): २१ सप्टेंबर रोजी राय उमानाथ बली प्रेक्षागृहात गणेश वंदना, ओवी, मंगळागौर, गोंधळ, भजने आणि संगीतमय नृत्यनाट्य. कोटा (राजस्थान) आणि अमरावती (आंध्र प्रदेश): २२ सप्टेंबर रोजी अनुक्रमे अहिल्याबाई होळकर सभागृह आणि वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पारंपरिक लोककलांचे सादरीकरण. कोलकाता (पश्चिम बंगाल): २२ सप्टेंबर




रोजी महाराष्ट्र निवासातील टिळक हॉलमध्ये स्तवन, गीतरामायण, कोळीगीते आणि देशभक्तीपर गीते. हैदराबाद (तेलंगणा): २३ सप्टेंबर रोजी भारतीय विद्या भवन येथे 'महा गणेशोत्सव' अंतर्गत विशेष सांस्कृतिक कार्यक्रम.

नवी दिल्लीत कला-संस्कृतीची मेजवानी

राजधानी नवी दिल्लीतही १५ ते २३ सप्टेंबर दरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये १५ सप्टेंबर रोजी भरत जाधव यांचा 'सही रे सही' नाटक प्रयोग, १७ सप्टेंबर रोजी वैभव जोशी व संदीप खरे यांचा चित्रपट गीतांचा कार्यक्रम, १८ सप्टेंबर रोजी संतोष भांगरे यांचे लोककला सादरीकरण, २० सप्टेंबर रोजी वैशाली सामंत व सहकाऱ्यांचा संगीत कार्यक्रम आणि २३ सप्टेंबर रोजी प्रमिला लोदगेकर यांच्या सादरीकरणातून लावणी परंपरेचा जागर केला जाईल.

दुबईत आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकपरंपरेचा प्रसार

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता स्विस इंटरनॅशनल ऑडिटोरियम येथे 'लोककलेतील श्रीगणेश' कार्यक्रम होईल. यात नमन, गण, जाखडी, मंगळागौर, कोळी व धनगरी नृत्यांचे सादरीकरण केले जाईल.

मुंबईत शास्त्रीय संगीताची सुरेल मेजवानी

राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच मुंबईकरांसाठी १७ ते २४ सप्टेंबर दरम्यान 'गणेशोत्सव २०२६ शास्त्रीय संगीत महोत्सव' रवींद्र नाट्य मंदिराच्या मिनी थिएटरमध्ये दररोज सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. यात सुभद्रा देसाई, एस. आकाश, मेहताब अली नियाझी, धनंजय हेगडे यांसह अनेक नामवंत कलाकारांचे गायन व वादन होणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सचिव किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम होत आहेत. या सर्व कार्यक्रमांमध्ये प्रवेश विनामूल्य असून, रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

### विघ्नहरे ..

विघ्ने ये विघ्नामागे
विघ्न हरा विघ्नहरे
शिव सुता गौरीपुत्रा
तुझीचंआम्ही लेकरे

परिस्थिती जितवले
टळला यम फास रे
तरी शांती हरविलो
सदैव मृत्यू भास रे

महाभारत लिही तू
कथन करी व्यास रे
पुन्हा युध्दे चालली
पुरे बाआता बास रे

महोत्सव सोहळे ते
सगे सोयरे ही विसरे
अंतरात स्थापी तुझं
स्थान ना दुजे दुसरे

कोल्हेकुई असह्य ही
भ्याली तुझीचं वासरे
पिडले कधी दुष्काळे
त्रस्त व्यस्त महा पुरे

आधार समर्थगणेशा
संकटा करे -हास रे
दूर व्हावे मळभ सारे
लयीत चालो श्वास रे

आगतम् सुस्वागतम्
जळीस्थळी तू वावरे
गोंधळले मात्र विश्वरे
मनुजा वेळीच सावरे

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### गण उत्सव ..

निर्बंध मुक्त उत्सव
यंदा होईलं साजरा
अति उन्माद नको
जपूनि तरीही जरा

पार्थीव मृण्मयमुर्ती
शोभे छान घराघरा
पर्यावरण जपायचे
घरातून साध्य करा

सार्वजनिकसोहळा
अर्थ तो जाण खरा
निरामय हो उत्सव
यावे वाटावे पाखरा

नसावी वर्गणीसक्ती
तोशिशआपले पदरा
मनोभावे शांतोत्सव
आनंद वाटे लंबोदरा

भसाड्या डीजे बुवा
नको बा तुझा तोरा
मधूरआलाप संगीत
छेडाव्या संयत तारा

व्याख्याने न् प्रवचने
समाजप्रबोधन करा
कलासक्त गजानन
वाव द्या कलाकारा

सोहळा निर्विघ्न हो
प्रिय हेचि लंबोदरा
निरोप देता आसवे
यावे वाटो विघ्नहरा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

पान ४ वरून

### चित्रकला, निबंध स्पर्धेला

शब्दांत आपले विचार मांडले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रोत्साहनपर रोख पारितोषिके देण्यात आली. यात प्रथम ३०० रुपये, द्वितीय २०० रुपये आणि तृतीय १०० रुपये अशी रोख बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींना सहभाग प्रमाणपत्र वितरित करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष आणि शालेय समितीचे सदस्य श्लोक जगदीश अग्रवाल, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री शुक्ला, श्री गणेश महासंघाचे महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष महेश धन्नावत, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, उपाध्यक्ष गौरव बोरा, डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, युवा उद्योजक अर्जुनजी पित्ती, मार्गदर्शक बाबा नंद यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या कलात्मक व बौद्धिक कौशल्याचे कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी चंद्रकांत दायमा, दिपाली कुलकर्णी, मीनाक्षी दुर्गम, दिपाली अग्रवाल, श्री. राठी, श्री. जैन आणि ज्योती पोहेकर यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत दायमा यांनी केले तर उपस्थितांचे आभार दिपाली कुलकर्णी यांनी मानले.

### रोटरी मिसेस आरोग्यवती

ओळखून प्रतिबंध करण्यासाठी 'मॅमोग्राफी' ही तपासणी श्री साई डायग्नोस्टिकच्या सहकार्याने विशेष सवलतीच्या दरात ऐच्छिक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. या स्पर्धेत केवळ पहिले २०० अर्ज करणाऱ्या महिलांनाच प्रवेश मिळणार आहे. ही स्पर्धा ४० ते ५० वर्षे, ५० ते ६० वर्षे, ६० ते ७० वर्षे यातीन वयोगटांत घेतली जाणार आहे. प्रत्येक वयोगटातील विजेत्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम पुरस्कारांसह इतरही अनेक आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी प्रवेश फॉर्म आर. पी. रोडवरील मंत्री हॉस्पिटल, पोस्ट ऑफिस रोडवरील श्री साई डायग्नोस्टिक सेंटर, मोदीखाना भागातील डॉ. छाबडा हॉस्पिटल, खरपुडी टी पॉइंट वरील विघ्नहर्ता मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, प्रीतीसुधानगरमधील सम्यक हॉस्पिटलमध्ये १५ ते २५ सप्टेंबर पर्यंत मिळतील. त्यांनी ते ४ ऑक्टोबरपर्यंत वरीलपैकी कोठेही जमा करावयाचे आहेत. तपासणी अहवाल सादर झाल्यानंतर विजेत्यांची निवड घोषित केली जाणार आहे. महिलांनी वेळेत फॉर्म भरून या आरोग्य चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड, सचिव डॉ. अतुल जिंतूरकर, कोषाध्यक्ष केतन शहा, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, प्रकल्प प्रमुख डॉ. आरती मंत्री, निर्मला साबू, सरिता बजाज, डॉ. चंद्रिका म्हस्के, डॉ. सुजाता देवरे, रोटरी रेनबोचे पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.

पान १ वरून

### आ.बबनराव लोणीकर

कणा असलेला शेतकरी सध्या विविध अडचणींचा सामना करीत आहे. अनेक भागांत पावसाची प्रतीक्षा असून खरीप पिकांना पाण्याची गरज आहे. त्यामुळे विघ्नहर्त्या गणरायाने बळीराजावरील सर्व संकटे दूर करावीत, शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य फळ मिळावे आणि त्यांच्या जीवनात पुन्हा आनंदाचे दिवस यावेत, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. 'शेतशिवार हिरवाईने फुलू दे' राज्यात समाधानकारक पाऊस पडून शेतशिवार पुन्हा हिरवाईने फुलावे, शेतकऱ्यांच्या घरात सुख-समृद्धी नांदावी, पिके जोमाने बहरावीत आणि प्रत्येक कुटुंबाच्या जीवनात आनंद, आरोग्य व समाधान लाभावे, असे साकडेही गणरायाला घालण्यात आले. समाजातील सर्व घटकांमध्ये बंधुभाव, सलोखा आणि समृद्धी नांदावी, अशीही प्रार्थना करण्यात आली. गणेशोत्सव हा श्रद्धा आणि भक्तीबरोबरच सामाजिक एकात्मतेचा उत्सव आहे. विघ्नहर्त्या गणरायाच्या कृपेने महाराष्ट्रावरील सर्व संकटे दूर होऊन राज्य विकास व समृद्धीच्या दिशेने वाटचाल करावे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या मंगलप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर, आमदार बबनराव लोणीकर वंदनाताई लोणीकर, श्रीजय लोणीकर, विक्रम उफाड, विलास घोडके व कौशल पाटील यांच्यासह कुटुंबीय व निकटवर्तीय उपस्थित होते. सर्वांनी श्री गणरायाचे दर्शन घेत आरतीमध्ये सहभाग नोंदविला.

### रोटरी क्लब जालना

परिश्रम घेतले. यावेळी पंकज पाटणी, डॉ. प्रतिक लाहोटी, गौरव मोदी, सुरज गेही, अमित शाह, प्रशांत बागडी, पियुष मुथा, दीपक गेही, धवल मिश्रीकोटकर, ड. महेश धन्नावत, राहुल रुणवाल, अक्षय जयस्वाल आदींची उपस्थिती होती. शेवटी क्लबचे सचिव मनमोहन भक्कड यांनी आभार प्रदर्शन केले

### माळीपुरा जामा मस्जिद

जंतुनाशक पावडरचा छडकाव करून नाल्यांची साफसफाई करावी आणि नियमित फवारणी मोहीम राबवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेख अनीस मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. केवळ एकदा धूर फवारणी करून प्रश्न मिटणार नसून, प्रभाग क्रमांक १० मध्ये नियमित स्वच्छता, नाल्यांची साफसफाई आणि डास प्रतिबंधक फवारणीचे नियोजन करण्याची गरज असल्याचे शेख अनिस मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

✻मतं घेतली, आता नागरिकांना वाऱ्यावर सोडलं! दरम्यान, प्रभाग क्रमांक १० मधून निवडून आलेल्या नगरसेवकांच्या कार्यपद्धतीवर सामाजिक कार्यकर्ते शेख अनीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निवडणुकीच्या वेळी नागरिकांची मतं मागितली आणि निवडून आल्यानंतर नागरिकांच्या समस्यांकडे पाठ फिरवली. नागरिकांच्या अडचणींशी नगरसेवकांना काही घेणेदेणे नसल्याचे चित्र आहे. नागरिकांना अक्षरशः वाऱ्यावर सोडण्यात आले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया शेख अनीस यांनी दिली. प्रभागातील पाणी, वीज, घाण-कचरा, नाल्यांची साफसफाई अशा मूलभूत समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. नगरसेवकांचे लक्ष नागरिकांच्या प्रश्नांपेक्षा ठेकेदारी आणि गुत्तेदारीकडे अधिक असल्याचा आरोपही सामाजिक कार्यकर्ते शेख अनीस यांनी केला. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ नको! माळीपुरा जामा मस्जिद चौकातील डासांचा प्रश्न हा केवळ अस्वच्छतेचा विषय नसून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने कागदी आश्वासनांपुरते न राहता तातडीने प्रत्यक्ष कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महानगरपालिका प्रशासनाने प्रभाग क्रमांक १० मधील परिसराची तातडीने पाहणी करून फॉगिंग, नाल्यांमध्ये जंतुनाशक पावडर फवारणी, कचरा व साचलेल्या पाण्याची विल्हेवाट आणि नियमित स्वच्छता याबाबत ठोस कृती करावी. अन्यथा नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आणखी गंभीर झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित होत आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शेख अनिस भाई, तनवीर भाई, एकबाल भाई, अरबाज़ खान, कलीम, मुसाहेब कुरेशी, शेख काशीफ, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### कारची काच फोडून

तपासाच्या आधारे मोटारसायकलवरून दोन आरोपींनी कारचा पाठलाग करून काच फोडून पैसे चोरल्याचे निष्पन्न झाले. तपासात गुंजी चालराजु जबराज आणि गुड्डेटी विनोत प्रभुदास, दोघेही रा. कपरला टिपा, ता. बिटरगुंटा, जि. नेल्लोर, आंध्र प्रदेश, यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे समोर आले. आरोपींच्या अटकेसाठी तपास पथक आंध्र प्रदेशात रवाना झाले. मात्र आरोपी मिळून आले नाहीत. दरम्यान, त्यांच्या राहत्या घरातून चोरीस गेलेली सहा लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात पोलिसांना यश आले. उर्वरित रक्कम आणि अन्य आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक पुढील तपास करत आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जालना पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक एस. आर. कुकलारे, पोहेकॉ/६७१ ए. एस. दासर, पोको/२२७ भडंगे, पोको/३४२ पी. के. गोलवाल आणि पोको/१६९९ एस. जे. तडवी यांनी सहभाग घेतला.

### नंदापूरला मिळणार

अंतरावर असल्याने महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सहज नजरेत हे मंदिर भरणार आहे. भव्य स्वरूपातील भारत माता मंदिरामुळे नंदापूरकडे येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधले जाणार असून, भविष्यात हे मंदिर गावाचे प्रमुख आकर्षण आणि एक वेगळी ओळख ठरण्याची शक्यता आहे. भारत माता मंदिराच्या माध्यमातून केवळ धार्मिक भावना जोपासण्याबरोबरच देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय संस्कारांचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे या मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याकडे नंदापूरसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. ग्रामस्थांकडून उपस्थितीचे आवाहन लोकार्पण सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात विविध तयारी करण्यात येत असून, नंदापूर ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास नंदापूर तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, नंदापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. जय भारत माता की जय या जयघोषात होणारा हा लोकार्पण सोहळा नंदापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रभक्तीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# भाजपा जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणीची बैठक उत्साहात ; बूथपासून जिल्हास्तरापर्यंत संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार

जालना / प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक जुना जालना येथील मुक्तेश्वर लॉन्स येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी काळातील संघटनात्मक कार्यक्रमांना गती देण्याबरोबरच बूथपासून जिल्हास्तरापर्यंत पक्षसंघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहनही करण्यात आले. बैठकीची सुरुवात भारत माता, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. पक्षाचे ज्येष्ठ नेते, विद्यमान व माजी आमदार, जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष आणि विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संघटनात्मक कार्यक्रमांवर सविस्तर मंथन बैठकीत आगामी काळातील पक्षाच्या संघटनात्मक वाटचालीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सेवा संकल्प अभियान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे बूथस्तरावर प्रभावी आयोजन, ड्खठ संदर्भातील कामकाज, पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण उपक्रम तसेच पक्ष विस्ताराच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. पक्षाची संघटनात्मक ताकद बूथमध्ये असल्याने प्रत्येक बूथ अधिक सक्षम करण्याबरोबरच कार्यकर्त्यांचा नागरिकांशी सातत्यपूर्ण संपर्क असावा, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. गाव, मंडळ, तालुका आणि जिल्हास्तरावरील पदाधिकाऱ्यांमध्ये अधिक समन्वय निर्माण करून पक्षाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प करण्यात आला. शेतकरी कर्जमाफीबद्दल अभिनंदनाचा ठराव युवाशक्ती आणि नारीशक्तीच्या योगदानातून विकसित भारताच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीचे बैठकीत अभिनंदन करण्यात आले. तसेच अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मिळालेल्या कर्जमाफीबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. शेतकरी हितासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.





शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवा केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे ही कार्यकर्त्यांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, युवक आणि विविध समाजघटकांसाठी शासनाने राबविलेल्या योजनांची माहिती घरोघरी पोहोचविण्याबरोबरच नागरिकांना त्यांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.




जनतेशी असलेले नाते अधिक दृढ करणे, पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधील समन्वय वाढविणे आणि प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचविणे या उद्देशाने आगामी काळात अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. बैठकीच्या समारोपप्रसंगी 'सेवा, सुशासन आणि संघटन' या विचारातून जनसेवेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा तसेच जालना ग्रामीण जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा संकल्प करण्यात आला. यि बैठकीस माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर, भास्कर दानवे, माजी आमदार विलास खरात, सतीश घाडगे या दिग्गज नेत्यांसह जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थिती होती.

# परतूर ग्रामीण रुग्णालयात दररोज नेत्र तपासणीची गरज

## आठवड्यातून केवळ एक दिवस तपासणी; तीही पूर्णवेळ नसल्याने रुग्णांची गैरसोय

परतूर / प्रतिनिधी : परतूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता येथील ग्रामीण रुग्णालयात नेत्र तपासणीची सुविधा दररोज उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र सध्या नेत्र तपासणी आठवड्यातून केवळ एकाच दिवशी होत असून, त्या दिवशीही पूर्णवेळ सेवा मिळत नसल्याची रुग्णांची तक्रार आहे. परिणामी गोरगरीब व ग्रामीण भागातील नेत्ररुग्णांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत असून त्यांच्या खिशाला हजारो रुपयांची झळ बसत आहे. परतूर ग्रामीण रुग्णालयावर शहराबरोबरच तालुक्यातील अनेक गावांतील नागरिक आरोग्यसेवेसाठी अवलंबून आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे शासकीय रुग्णालयातील मोफत अथवा अल्पखर्चातील उपचारांना प्राधान्य देतात.



मात्र नेत्रविकारांच्या रुग्णांची संख्या वाढत असताना तपासणीची सुविधा नियमित उपलब्ध नसल्याने रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

**आठवडाभर करावी लागते प्रतीक्षा**

डोळ्यांची जळजळ, दृष्टी कमी होणे, डोळ्यांतून पाणी येणे, मोतीबिंदू तसेच इतर नेत्रविकारांसाठी तपासणीची आवश्यकता असलेल्या रुग्णांना ठरावीक दिवसाची प्रतीक्षा करावी लागते. ग्रामीण भागातून अनेक रुग्ण वेळ आणि प्रवासखर्च करून रुग्णालयात येतात. मात्र त्या दिवशी तपासणी न झाल्यास त्यांना पुन्हा परत जावे लागते. त्यामुळे वेळ आणि पैशांचा दुहेरी फटका बसत असल्याची भावना रुग्णांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः वृद्ध नागरिक आणि गावखेड्यातून येणाऱ्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. नेत्रविकारामध्ये वेळेत तपासणी आणि योग्य उपचार महत्त्वाचे असल्याने ग्रामीण रुग्णालयात नियमित नेत्र तपासणीची व्यवस्था असणे आवश्यक असल्याची मागणी पुढे येत आहे. दररोज नेत्र तपासणी सुरू करण्याची मागणी परतूर ग्रामीण रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन नेत्र तपासणीसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करावे, दररोज किंवा किमान अधिक दिवस पूर्णवेळ नेत्र तपासणी सुरू करावी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळतील यासाठी आरोग्य प्रशासनाने ठोस व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### गोरगरीब रुग्णांना आर्थिक फटका

परतूर ग्रामीण रुग्णालयात नेत्र तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता ही सुविधा दररोज उपलब्ध असणे गरजेचे आहे. सध्या आठवड्यातून केवळ एक दिवस तपासणी होते आणि तीही पूर्णवेळ होत नसल्याने ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. नाईलाजाने खासगी रुग्णालयात जाऊन उपचार घेताना हजारो रुपये खर्च करावे लागत आहेत. आरोग्य विभागाने याची तातडीने दखल घेऊन ग्रामीण रुग्णालयात दररोज नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

– संतोष सातोनकर

### खासगी उपचारामुळे आर्थिक भुर्दंड

शासकीय रुग्णालयात वेळेवर तपासणी उपलब्ध न झाल्यास अनेक रुग्णांना नाईलाजाने खासगी रुग्णालयांकडे वळावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तपासणी, औषधोपचार आणि आवश्यक उपचारांसाठी सुमारे ८ ते १० हजार रुपयांपर्यंत खर्च होत असल्याचा दावा केला जात आहे. हातावर पोट असणाऱ्या तसेच आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या कुटुंबांसाठी हा खर्च परवडणारा नसल्याने आरोग्य विभागाने या प्रश्नाची तातडीने दखल घेण्याची मागणी होत आहे.

# धोपटेश्वर येथे वाजत-गाजत बाप्पाचे आगमन

## ढोल-ताशांचा गजर अन् 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला

नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : धोपटेश्वर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही लाडक्या गणरायाचे मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि वाजत-गाजत आगमन झाले. ढोल-ताशांचा गजर, गणेशभक्तांचा उत्साह आणि 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. बाप्पाच्या आगमनानिमित्त गावात सर्वत्र उत्साहाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. गणरायाच्या आगमनासाठी ग्रामस्थांनी उत्साहात तयारी केली होती. बाप्पाची मूर्ती आणण्यासाठी बाळगोपाळ, युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या



संख्येने सहभागी झाले. ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईने ठेका धरला, तर चिमुकल्यांचा उत्साहही विशेष लक्षवेधी ठरला. पारंपरिक पद्धतीने आणि भक्तिमय वातावरणात बाप्पाची मिरवणूक गावातून काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी गणरायाचे स्वागत करण्यात आले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषामुळे वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. आबालवृद्धांनी मिरवणुकीत सहभागी होत गणरायाचे दर्शन घेतले. विशेषतः बाळगोपाळांचा उत्साह पाहण्यासारखा होता. तरुणांसोबतच ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गणेशोत्सवाच्या आनंदात भर घातली. बाप्पाच्या आगमनानंतर विधिवत पूजा-अर्चा करून श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. गावातील नागरिकांनी गणरायाच्या चरणी सुख, शांती, समृद्धी आणि सर्वांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. शेतकरी बांधवांच्या जीवनात समृद्धी यावी आणि गावाचा सर्वांगीण विकास व्हावा, अशीही मनोकामना व्यक्त करण्यात आली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने धोपटेश्वरमध्ये पुढील काही दिवस धार्मिक व सामाजिक उपक्रमांची रेलचेल राहणार असून गणरायाच्या आगमनाने गावातील वातावरण भक्तिमय झाले आहे. उत्सवाच्या माध्यमातून गावातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



लाडक्या बाप्पाच्या आगमनाचा आनंद! बदनापूर येथील गणेश खेंडके व पत्नी सोनाली खेंडके यांनी उत्साहात केले बाप्पाचे स्वागत.

# वंचित बहुजन आघाडी जालना जिल्हा पुर्व कार्यकारिणीची संघटनात्मक बैठक उत्साहात संपन्न

परतुर: वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी परतुर येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी पुर्व जिल्हा व तालुका कार्यकारिणीचा संघटनात्मक आढावा घेण्यात आला . या बैठकीमध्ये संघटनात्मक बाबी, पक्षाचे आगामी नियोजन तसेच विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीचे आयोजन पुर्व जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात



यांनी केले तर यावेळी प्रमुख उपस्थिती जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर खरात जिल्हा कोषाध्यक्ष सतीश खरात जिल्हा सचिव शेख जमीर भाई हनुमंत मोरे किशोर तुपे समाधान तोडगे ,बाबासाहेब गालफाडे सतीश पट्टेकर अँड .शुभाष चाबूस्कवार रामचंद्र पानवाले शेषराव शिनगारे गौतम खंडागळे सचिन भदर्गे गोकुळ शिनगारे स्वप्निल पहाडे दीपक हिवाळे दिलीप बाळू गाते साळवे प्रदीप साळवे रुपेश पहाडे विकास पहाडे सागर पहाडे राहुल पहाडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



घराघरात गणरायाचे आगमन गणरायाच्या आगमना निमित्त गणरायाचे औक्षण करताना माता भगिनी

# चित्रकला, निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जालना/प्रतिनिधी : श्री गणेश महासंघ, जालना, श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित चित्रकला आणि निबंध स्पर्धेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण २३० विद्यार्थिनींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

चित्रकला स्पर्धेत विद्यार्थिनींनी आपल्या कल्पकतेने विविध विषयांवर आकर्षक चित्रे रेखाटली, तर निबंध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी **(पान ३ वर)**

# बैलगाडीतून बाप्पाचे आगमन; गोवत्स गणराज गणेश मंडळाची पारंपरिक गणेश आगमन मिरवणूक

जालना : गोवत्स के गणराज गणेश मंडळ,बडी सड़क, जालना यांच्या वतीने गणेश चतुर्थीनिमित्त श्री गणरायाच्या आगमनाची पारंपरिक मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. यावेळी सजवलेल्या बैलगाडीत श्री गणपती बाप्पा विराजमान होऊन मंडळाच्या स्थळी दाखल झाले. गोवत्स गणराज गणेश मंडळाची गणेशमूर्ती हे यंदा विशेष आकर्षण ठरले. कोणत्याही प्रकारची फॅन्सी व अनावश्यक बदल न करता प्राचीन व पारंपरिक स्वरूपातील साधी, सात्त्विक आणि प्रसन्न मूर्ती मंडळात



विराजमान करण्यात आली आहे. मूर्ती छोटी, उत्सव मोठा हे मंडळाचे ब्रीद असून, मूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती, संस्कृती, परंपरा आणि उत्सवातील उत्साहाला मंडळाकडून अधिक महत्त्व दिले जाते.

# रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेचे आयोजन

जालना/प्रतिनिधी : महिलांनी आपल्या आरोग्याविषयी जागरूक राहावे, नियमित तपासण्यांद्वारे संभाव्य आजारांचे वेळेत निदान व्हावे आणि महिलांमध्ये निरोगी जीवनशैलीची सवय रुजावी, या उदात्त उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्यावतीने 'रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना अत्यंत सवलतीच्या दरात विविध महत्त्वाच्या वैद्यकीय तपासण्यांची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या उपक्रमाविषयी माहिती देताना रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड म्हणाल्या की, कुटुंबाची अहोरात्र काळजी घेताना महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनेक आजारांचे निदान वेळेवर झाल्यास पुढील गंभीर धोके टाळता येतात. महिलांनी स्वतःच्या स्वास्थ्याला प्राधान्य द्यावे, त्यांच्यात आरोग्याविषयी सकारात्मक स्पर्धात्मक जाणीव निर्माण व्हावी आणि प्रतिबंधात्मक तपासण्यांद्वारे महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे, हाच या मिसेस आरोग्यवती स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

स्पर्धेअंतर्गत डॉक्टर आर. पी. रोडवरील रुबी हॉस्पिटलचे डॉ. राजेश सेठीया हे थायरॉईड व ब्लड शुगर टेस्ट, मंत्री हॉस्पिटलच्या डॉ. श्वेता मंत्री ह्या लिपिड प्रोफाईल टेस्ट, प्रीतीसुधा नगर येथील सम्यक हॉस्पिटचे डॉ. अतुल जिंतूरकर हे बोन डेन्सिटी टेस्ट,करतील. कसबा भागातील विठ्ठलजवळील महेश क्लिनिकच्या डॉ. अमृता महेश कुलकर्णी ह्या बॉडी फॅट नालिसिस करणार असून, डॉ. अर्चना काबरा (श्री कृष्ण हॉस्पिटल), डॉ. रामेश्वर वरकड (न्यू मोंढा रोड), डॉ. धिरज छाबडा (मोतीखाना) आणि डॉ. किशोर टेपले (शतायु मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल) हे फिजिशियन अन्य तपासण्या करणार आहेत. याशिवाय, सहभागी महिलांसाठी स्तनाचा कर्करोग लवकर **(पान ३ वर)**

# अवचितराव टेकाळे यांना पुत्रशोक

जालना : बदनापूर तालुक्यातील हिवरा (दाभाडी) येथील प्रतिष्ठीत नागरीक श्री. अवचितराव रंगनाथराव पा. टेकाळे यांचे चिरंजीव एकनाथ अवचितराव टेकाळे (वय ३९) यांचे रविवार १३ सप्टेंबर रोजी रात्री ११.१५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या



पश्चात आई, वडील, भाऊ, वहिणी, पत्नी, मुलगा व अन्य नातेवाईक असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवार १४ सप्टेंबर रोजी सकाळी हिवरा (दाभाडी) येथील नवीन गाव स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्ट, नातेवाईक, पंचक्रोशील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.